# पानमोकळं

सावित्री जगदाळे



# पानमोकळं

(काव्यसंग्रह)

सावित्री जगदाळे

सावली प्रकाशन

◆ **प्रकाशक : रामचंद्र जोरवर**
सावली प्रकाशन
"सावली", रक्षालेखा सोसायटी,
विक्रमनगर, धनकवडी, पुणे - ४११ ०४३.
फोन : २४३७४४९८/२४३७१०२६

◆ **पानमोकळं** (काव्यसंग्रह)

◆ **© श्रीकृष्ण जगदाळे**
श्री. एच. के. जगदाळे (डी. वाय. एस. पी.),
पवन-डी ५०५, डीएसके विश्व, सिंहगड रोड, धायरी, पुणे ४१

◆ **प्रथमावृत्ती :** १५ ऑगस्ट २००९

◆ **प्रकाशन क्र. :** ५७

◆ **मुखपृष्ठ :**
स्वप्नाली कदम

◆ **अक्षरजुळणी :**
श्रेया टाईपसेटिंग
३९६, किरण सोसायटी, सहकारनगर नं. १,
पुणे - ४११००९. ● फोन : २४२२६३४७

◆ **मुद्रक :**
श्री मुद्रा
पुणे.

◆ **किंमत :** ९०/- रुपये फक्त



माणसामाणसातील वात्सल्याला
मनामनातील विश्वासाला
दिलेल्या शब्दाला
जागण्याच्या वृत्तीला

सौ. सावित्री जगदाळे

## सौ. सावित्री जगदाळे यांची पुस्तके

- ★ एकट पाखरू
- ★ तांबडं फुटलं
- ★ फुटवा
- ★ अंकुरात सजला साज
- ★ सफर मंगळावरची

# आता कुठे...

आता कुठे रुजू लागलेली मुळे
पायही म्हणत होते आपलीच वाट
झाडे ओळखायला लागलेली माझे श्वास
... पालवी फुटू लागलेली दाट

चालणाऱ्याने नसतेच थांबायचे कुठे
उगाच उदास झाले मी सगळ्यांपासून दूर जाता
पिवळ्या पानांविषयी असेलच ना
झाडालाही माया ममता

आता नसेल कोवळीक नव्या ओळखीची
पुसट होतातच जुन्या आठवणी
मी माझ्या उरी इथल्या करू शकते
बऱ्या वाईट क्षणांच्या साठवणी

तसं तर बाईचं कुठलं घर
किंवा कुठलं गाव?

# माझ्या प्रिय घरा...

चिमणीच्या घरट्याला जोजविणाऱ्या माझ्या प्रिय घरा
नकोच आहे तुला माझा सहवास
उपऱ्यासारखं जगताना
इथेच राहण्याचा हवा कशाला अट्टाहास

तुझ्या भूमीला भार होऊन
कशाला करू हवा प्रदूषित
माझ्यासाठीची संपली तुझ्यातली ओल
तेव्हाच... कळलं मला
इथली मनंही झालीयेत माझ्याविषयी कलुषित

माझीही ओढ नाही आता कशात
कोरडं, कोरडं, कर्कश्श, कार्बनयुक्त
नाही जगायचंय मला
नव्हती रुजली मुळे या मातीत प्रयत्नानेही
पालवीचा श्वास गुदमरलेला

मातीचा गुण म्हणायला मातीशी
नातं उरलंय कुठवर?
कुणी नाही घालणार इथे
निरोपाचं दही हातावर?

# जिवट

पाठीशी खंबीरपणे उभे राहणाऱ्यानेच
खंजीर खुपसावा एका बेसावध क्षणी
आपले सांडलेले रक्त पाहताना
जीव जात नाही तरी येतेच ना अंधारी !

विश्वास उडतो नात्यावरचा
नकोच वाटतो कांच आता कुठल्या आधाराचा
भूतकाळातल्या आसुडांचे वळ घेऊनच
सुकवायचाय पाऊस डोळ्यातल्या धारांचा !

विझतच नाही माझ्यातली मी !
वादळ वारा थकल्यावर
पंख फडफडावेत पानामागच्या पक्ष्याने
तसा जागतो जिवटपणा तडफडल्यावर !

## नाती

जसं लावू जिथं लावू तिथं वाढतं
नात्यानात्याचं झाड
फळांच्या बहरावर बसतात
टोच्या, कधी दगड, कधी काठ्या

रक्ताची ओढ रक्ताकडेच असते म्हणतात
काहींच्यात फक्त चुंबकाचं, काहींच्यात लोह
कुणाला रक्ताच्या धगीमुळं होरपळ
कुणाला नातेसंबंधातला अनाकलनीय मोह

चिवट नाती जळवासारखी
वेदना न देता रक्त शोषणारी
क्षुद्र स्वार्थांनी बरबटलेली
काही नाती गरळ ओकणारी

दुसऱ्यांचे श्वास रोखून धरले तर
आपलाही होतोच की कोंडमारा
युद्ध जिंकल्याचा हिंस्त्र आनंद रक्ताळलेला
काळापुढे कर्माचा कसला मिरवायचाय तोरा

## भान

अखंड जैविक साखळीचा एक दुवा
आजला उद्या जोडत रात्रीच्या रात्री जागत
जगण्याची जाणीव झाल्यामुळे सोसणं जातं वाढत
एवढंच भान येण्याचं आहे प्राक्तन

तुझ्याशिवायचे जगणे अवघड नाही फारसे
...जाणवतोही अभाव
समुद्रात दूरवर गेल्यानंतर जमिनीपासून
व्याकूळ होतोच ना जीव

एकेक आधार मावळत जातोय
नवी लागवड न करता निरोप मिळताहेत
नसते धग कमी कलत्या दुपारी
पायाखालची हिरवळ तरी असावी खरी

## साडेतीन हात देहाची

एवढीशी तर असते गरज
इथलीच हवा घ्यायची अन् इथेच सोडायची
तरी का मांडतो एवढा पसारा आपण
जीवघेणी सवय कधी संपायची

आभाळ असतेच आपल्यापुरते
अंधारालाही सरावतात डोळे
का चढतात इमल्यावर इमले
रोषणाईसाठी लटकतात हंड्या झुंबरे

तुझ्या-माझ्या जगण्यावरचे संस्कारी पापुद्रे
कधी होणारेयेत दूर
मोकळा श्वास घेण्यासाठी गर्भगाभ्यावरचे
कधी वितळणारेयेत अगणित थर

## फेर

फेर धरून रंगात आलेले गाणे
हातात हात घालून गोल फिरताना
टाळीवर पडता टाळी पाहिले मी
दचकून सगळे मागे सरताना

कोणते दिले मी चटके त्यांना
जो तो मला टाळत आहे
दूर दूर जातानाही का मग
माझ्यावर सदा त्यांची पाळत आहे

असून गर्दी गोंगाट
तरी मिळतो मला एकांत
अदृश्य घाव झेलीत
कुवार मौनासारखे राहते मुकाट

मी नकोच आहे कुणाला
मला तरी हवेत कशाला आसू
एकाकी आयुष्यातील क्षण मोजताना
येते स्वतःच्या वेदनेचे हसू

## प्रश्न

तूच शिकवले होते मला
उन्हाळा धरून जिव्हाळा पांघरायला
दूर गेलास आता फार
बकुळीची फुले उरली चौकटीच्या तोरणाला

तेवढाच शेर इथला तुझा
तेवढेच होते दोघांचे ऋण
मानतेच मी आताशा नियतीला
खुडून टाकताना उगवणारे प्रश्न

खंत राहील सदा जिव्हारी
का दुरावले सख्य जिवाभावाचे
भूतकाळात जाऊन येता सैरभैर मन
हाती थेंब फक्त उष्ण आसवांचे

## दान

हताश हतबल अपंगाप्रमाणे
स्वत:साठी तरी जगत राहते
माझा हात मी
न भिता जळालेला पाहते

रक्ताळलेली सरपट
रांगत मातीशी वळवळते
आंधळ्या डोळ्यांनी मूठभर जोंधळ्याचा
जोगवा मी मागते

लाचार ओशाळी भिकारीण
कौल मागत फिरते
प्रतिभेचे मिळालेले दान
तरी शब्द चोरते

## क्षण क्षण जगून

क्षण क्षण जगून कर्माचे डोंगर
रचून ठेवतो आपणच वारुळाप्रमाणे
नागोबा विसावतो अनायसे
वेदनेचे डंख डसतात कणकण विषाप्रमाणे

आपणच पेरलेले असतात आपल्या वाटेवर
फुले, काटे, दगडधोंडे, कुठे कुठे सुरुंग
स्वत:च्या बचावाचा खरा खोटा पवित्रा
रक्षणासाठी उभारलेला आपलाच आपण तुरुंग

घाण्याला जुंपलेले परावलंबी आयुष्य
पिंजत बसता कापूस गुंता वाढत राहतो
साठवून ठेवतो आपणच सभोवती काडीकचरा
अन् उभ्या ज्वालांच्या धगीत करपत राहतो

## शोध घेता घेता...

इच्छा नसतानाही घडत राहतात
काही काही गोष्टी
आयुष्यभराच्या खोल जखमांचे व्रण ठेवून जातात
हलत नाही त्यावरून व्याकुळलेली अंतर्दृष्टी

रक्त जाळणाऱ्या चांदण्या तडतडतात
तेव्हा कवटीलाही जातात तडे
मित्र म्हणून नागाला कुरवाळावे
तर तो उभारणारच ना फडे

झरा शोधण्यासाठी खडक फोडताना
पडतेच वेदनेची भूल
तहानलेल्या देहातून निथळताना घामाच्या धारा
धरतीच्या धगीतून फुलते ज्वालामुखीची चूल

## ...मुक्तता

किती धुमसावे राखेने काळजात ठिणगी घेऊन
नसतेच प्रकाशाची स्पष्टता
स्मृतीच्या आगीत जळावेत बंध
पिऊन घ्यावी आभाळवाऱ्याची मुक्तता

जाऊ कुठेतरी दूर
नको मायेची ऊब
शुभ्र हिमालयी बर्फावर
लावू दीप पेटवू धूप

नकोत आता पहारे
जखडून ठेवणारे साखळदंड
होऊ मुक्त उन्मुक्त
ठरवून आपुलेच आपण मापदंड

पुरून उरायचं जगात
ऑक्सिजनचा कण कण होऊन
पसरत रहायचं सदा
पाण्याचा थेंब थेंब होऊन

# अंतर

घर भरलेलं होतं तेव्हा
एकांत शोधत होतो आपण दोघे
रिकाम्या घरात रिकामे बहाणे
दिवसेंदिवस अंतर वाढतेय अवघे

एकमेकांकडे करून पाठी
शोधतोय आपापल्या सुखाचे ठेवे
एकमेकांना डावलून आत्ममीलन होत नसते
केंव्हा होणारेय आपल्याला ठावे

नाहीच समजणार तू मला... मी तुला...
हेच गृहीत धरून बसलोय
कुठल्या आशेने मग
एकमेकांत गुंतलोय

## विसर्जन

तू पाऊस विरहात जाळणारा
दूरातल्या इंद्रधनूचा दुखावतो पिसारा
तुझ्या श्वासात फुलताना
त्या गंधात न्हाहते वेदना

तुझ्या दाहकतेत आताशा
मी मौन पांघरते सोनेरी
तुझ्या हिरण्यगर्भी अस्तित्वात
हिणकस जाळायचेय अहंकारी

तुझ्या संगात मनाला करायचेय निवळ
आतून बाहेरून व्हायचंय नितळ
अंगोपांगी खेळवायचीय
तुझ्या अस्तित्वाची सळसळ

## धावाधाव

पाषाणाला जातील तडे
पावसाचे पाणी मुरता मुरता
फटीत अडकले झरे
विश्वास तेवढा तहानेपुरता

काय करावे काळोख भयाचे
देवळीत नसे दिवा
घन अंधारात उचलता पाऊल
कसा कळेल घुबडाचा कावा

ना ऐल ना पैल
अवतीभवती पुराचे पाणी
डोक्यावरच्या अदृश्य ओझ्यामध्ये
नाहीत पावले निळी

क्षणाक्षणाचे होते युग कुठे अंत असे याला
अखंड,अधांतरी दोलायमान
दाही दिशांना धावाधाव
कृष्णविवरातील तेजाचा गवसेना क्षण

## कविता

घट्ट दाट सायट्याच्या दह्यासारखे
दुःख साचून राहते, सलत राहते
आंबलेल्या क्षणांनी विघटन होता होता
शब्दांचे नवे रूप घेते

उमलतात अनाहत नाद शब्दांचे
फुलते लाही आचेवर अलगद
गर्जत येते अनावर आवेगी लाट
तशा फेसाळतात भावना उचंबळत

सृजनतेला सजवून
व्यथा वेदनेच्या प्रसववेळा
दुःख वैभवाची पखरण
लेवून येते कविता अनंत कळा

अंतर्मनाच्या गहिऱ्या गर्भगाभाऱ्यात
अविरत चाललेली घुसळण
अलिप्त होऊन तरंगतो हुंकार
कवितेची होऊन एकेक ओळ

# आई

माती उकरताना तुळशीची
अंगणी गजबज आईची
दाटतो गळा आठवून धून
गोठ्यातल्या हंबरत्या गायीची

मन कासावीस आज
घडी घडी माहेराचा आठव
मूरत दिसता जन्मदात्याची
झरत्या डोळ्यांची पापणीला कणव

मायेत अडकला मोही जीव
तुटलेपणाचे दुःख व्याकूळ
झाडाचे हे असे ऋतुगान
पानगळीचा पाचोळा खळखळ

जुन्या साडीची जरतारी किनार लावून गोधडीला
सासरी मिळावी ऊब लेकीला
काळीजमाया भरून राहिलीय ब्रह्मांडात
झुळूक गार ही मळभरल्या मनाला

# येणाऱ्यांसाठी

ती स्वत:च एक घर असते
जाड काँक्रीटच्या भिंतींची
येतात सगळे घराच्या आसऱ्याला
विसावतात निवांत आरामात
राहतात तिच्या ठाम भरवशावर
ती राबते, स्वागत करते
जिव्हाळ्याचं हसू उधळीत राहते

कधी कधी वाटतं याही घराला
जावं कुठंतरी निवाऱ्याला
पाखरांनी गजबजलेल्या झाडाच्या सावलीत
विसावावं भरवशाच्या मांडीवर डोकं
निसर्गाच्या अविरत संगीताच्या तालात
घ्यावी सुखनैव डुलकी

पण...
...घराला हे कसं शक्य आहे?
घराचा पायाच असतो मजबूत
बुलंद दरवाजे अन् उंच उंच उंबरठे

घराला कुठे चालता, हलता येतं?
वारा, पाऊस झेलीत उन्हात
वाट पहायची असते फक्त येणाऱ्यांची
... फक्त येणाऱ्यांची !

## भलतेच भय

शांत सारे समजुतीचे शब्द ओठावर
आशाळ कल्लोळ खदखदतो पोटात
अभिमान दडपून कोरडा ठेवला चेहरा
ओशट अपेक्षांचे भाव उमटती डोळ्यात

कळते पण वळत नाही
का वळवायचे हेही कळत नाही
रीतभात की स्वार्थ म्हणायचा हा
काय नाव द्यावे उमजत नाही

आपलेही असतात मातीचेच पाय
जमीन सरकण्याचे भलतेच भय
अस्तित्व टिकवण्यासाठीची जुनीच धडपड
गळवासारखी तडफड सलणारी सय

मनाविरुद्ध व्हावे लागते बेअक्कल
खळबळ, विखार, मत्सर, द्वेष झाकून
वागावे लागते धीराने ठेवून संयम
खुज्या लोकांनाही करावा लागतो नमस्कार वाकून

## साद

मेंदूही झिणझिणला
ऐकून माणसाच्या करामती
माथा झुकवायला आले तुझ्याकडे
विसरून सारी नाती

वाऱ्याने कवेत घेतले
शिळोप्यांच्या गप्पांत गुंगवले
मायाळू आभाळाने सोनेरी किरणांचे
पाठीवरून हात फिरवले

शिरीषाचं पान न् पान डोललं
मोहवला फुलांचा पिवळसरपणा मंद
धाडला वाऱ्याच्या झुळकीबरोबर
शिरीषफुलांनी स्नेहभरला गंध

पुढे पुढेच धावणाऱ्या कालचक्राचाही
सुरेख असतो नाद
येणाऱ्या अंधाराचे नाही उरत भय
ब्रह्मांडातला सूक्ष्म कण होताना निसर्ग घालतो साद

# वळीव

पावसाला भेटला वारा
आभाळाच्या अंगणात
चला चला रे आता
न्हाऊ मृदगंधाच्या धारात

आभाळाच्या प्रांगणात
घनव्याकूळ काजळाई
लखलखली सौदामिनी
क्षणभराची उजळाई

पेशीपेशीत भरले आभाळ
अंगी आली शितळाई
माखून घेतले गात्रांना
मन झाले जाई-जुई

डोलू लागले ओलेते
पाणावल्या वाऱ्याशी
थेंब थेंब दरवळला
मन मातीच्या गाभ्याशी

धारा धावती धावती
भाजल्या भुईवरती कारंजे
पागोळ्याही झाले आभाळ
वळचणीत पैंजण वाजे

दूर डोंगरातून येतो
मृदगंधी उधाण वारा
मनाला झोंबारूनी जाई
अंगाअंगातून उठे विजेचा शहारा

## श्रावण

ओली भिजट हवा पावसाळी
इथे तिथे ढग सांडलेले
हळूच डोकावता सूर्याने
कळीसारखे ऊन उमलले

सुवास जाईचा दरवळंतो
किरणांचे स्तोस्त्र उधळले
शहारून चमकली झाडेझुडपे
मातीनेही जरा अंग पसरले

पावसाची नाजूक सर अन्
हवेहवेसे ऊन श्रावणातले
बहरलेल्या नाना विविध पानाफुलांत
देव सारे सुखावले

डोंगरा लागली चटक
गार गंधित हिरवाईची
पानमोकळ्या झाडांची मागणी पुरवली
कोवळ्या पोपटी पालवींनी

# तू

पुराण पुरुषासारखा
प्रगल्भ, संयत धैर्यशील तू
अविचल, निश्चल अगाध
पर्वतासारखा प्रगाढ तू

धीरगंभीर गाज अन्
अविरत लाटांसारखा चैतन्यमय तू
पोटात वडवानल तरी
महासागरासारखा प्रशांत तू

आकाशी झेपावतात तुझ्या आकांक्षा
वाढ विकासाची जाणतोस मुळे तू
एकेक क्षण जातो निसटत तरी
क्षणात स्थिर होतोस तू

# लोहाचे तळवे

अंगारे झेलायचेच आहेत तर
चपळतेनेच झेलावेत
निबर होता होता हात घट्ट्याचे
निरागस चेहराही राहील प्रयत्नाने

पायाखाली काटेच असणारेयेत
अनवाणी चालण्याने होतील तळवे लोहाचे
निडर राहील चाल तेव्हाच
निसरडी हटेल वाट, टळतील क्षण मोहाचे

एकदा मांडलेला डाव नसतोच मोडावयाचा
तर तो रडीचा तरी का खेळावा
निग्रहाने धीराने घडत जाता
निर्भयपणाने सहज सावधतेने स्वीकारावा

# कृष्णविवराची ओढ

गजबजलेल्या गावात अन् घरात
सगळे तुझे म्हणवणारेच होते ते लोक
तूही सतत होतास आपल्या माणसांत
तरी तुटत चाललेलं मन एकटं

जगण्यातील वास्तवाच्या, अस्तित्वाच्या
मिटवायच्या होत्या सगळ्यांच दुखऱ्या खुणा
कब्जाच घेतला भयकंपित मनाने
काळ्याकभिन्न कृष्णविवराचा

जे होते तुझ्यावर अवलंबून
ते स्वतंत्र झाले तुझ्या पदराखालून
पोरकं नसतंच रे कुणी या आभाळाखाली
चालावे तरी लागतेच जमिनीवरून

जगूनच संपवायचे असतात मिळतील तसे दिवस
भोगून फेडायची असतात कर्माची फळे
देहाला सोडून पळून गेले तरी
संचित पाठीशी लागलेले

## बळी

काळजाचे हात तोकडे
तुझ्या पुढ्यात पसरतो
तू ये रे ऽ ये ऽऽ बरसत
तुझ्यासाठी जीव तरसतो

तू ओथंबूनी ये रे जलदा
पाणी दे रे दे ऽ आभाळा
काळ्या आईसाठी तू हो रे
जलभरूनी काळा काळा

थकले तन-मन
शिणले रे डोळे
आटले अवघे उमाळे
वाटे तोंड करू काळे

काळं झ्यार आभाळ
मनात दाटून आलंय
धापा टाकणाऱ्या मातीला
असं का रं टाकलंय?

असा रे का दुरावला
आता कशाला जगावे
तूच लागलास झिडकाराया
वाटे आता मरावे

## इथेच

इथेच रुजवायची आहेत मुळे
पैलतीरावरची फुले
हवीत कशाला?

इथेच घ्यायचाय श्वास
अंतराळातले आभास
नकोत मला !

इथेच संपवायचेत भोगुनी भोग
अशरीराला संग
कुणाचा?

गवसेना क्षितिजाची कड
जमिनीवरून आकाशाची ओढ
हवी कशाला?

काट्याकुट्यांनी टोचून आरक्त झालंय अंग
स्वप्नफुलांचा गोंडस रंग
नको डोळ्यांना !

# अधीनता

भातासारखे तळाशी
करपलेलं दुखरं मन
उधळता नाही येत
असे जळके क्षण !

असे का? कशासाठी?
प्रश्नांचे भेंडोळे गरगरत राहते
असेच म्हणे जगणे
निरुत्तर निरुद्देश नियतीच्या अधीन होते

## प्रार्थना

विन्मुक्त होऊन तुझ्यातून आर्त
झटकलेल्या धुलीकणांनी घ्यावे माखून
मग उमजतील का तुझे बोल
की जाळीत राहतील खोल खोल

तुझी इतकी तळातून आठवण येते
तुझे हृदय थोडेतरी हेलावते?
ढवळून निघतो माझा चित्तडोह
तुझ्या मनावर उठतात का थोडे तरंग?

तू सूर्य, तू ब्रह्मांड, तू विश्व अनंत
माझ्यासाठी हो कवी
स्पर्शासाठी आसुसलेली त्वचा
छिलून काढ धारदार शब्दांनी

...आणि गायीसारख्या डोळ्यात
ये उगवूनी...
प्राचीवरच्या हिरण्यगर्भासारखे

## घरट्यासाठी

आभाळभर फिरणारा सूर्य
न्याहळत उन्हं पेलता पेलता
अंकुरते नवी पालवी
पाखरांची किलबिल ऐकता ऐकता

घरट्यात विसावतात निश्चिंत
उद्याची स्वप्ने पाहत पाखरे
झाडाची पिकणारी पाने
दुर्लक्षितात पाखरे

उडून गेली सारी पाखरे
नवा दिवस अजमावण्यासाठी
व्याकूळ झाड उभे एकाकी
झेलत ऊन-पाऊस घरट्यासाठी

# जोडव्यांचा ताल

क्षीण झाले सगळे धागे
वस्त्र आयुष्याचे विरत चालले
ऊन-पावसाचे सोसून तडाखे
जगणे आता धुवट झाले

सोबती एकेक निघून गेले
ठेवून आठवणी गतकाळाच्या
उदासल्या दिशा वर्तमानाच्या
पाहून वाकुल्या लांब सावल्यांच्या

संपल्या आशा-आकांक्षा अन् स्वप्ने
निखळले मोह-मायेचे पाश
तरीही...
गुंतून राहतो जीव भरल्या कपाळात
जोडव्यांच्या तालात अन्
बांगडीच्या किणकिणाटात

# अध्यात्म

कर्मफुले वाहताना देवाला
त्यानेच निर्माण केलेल्या
घाणेरीप्रमाणे असतात कधी कधी
हल्ली मन चिकित्सक झालंय ख़रं
डार्विनचा सिद्धांत प्रमाण मानताना
भावभक्तीचा सुगंध कमीच झालाय
मग विकतच आणावा लागतोय
उदबत्तीचा सुवासिक पुडा !

मजेत राहताना, आनंद मिळवताना
त्यागाचा प्रश्न येतोच कुठे?
आदर्श दीपस्तंभाप्रमाणे जळणे जमत नाही
फुलवाती निरांजनात तेवत ठेवाव्या लागतात
स्थितप्रज्ञाप्रमाणे ठेवावे लागते स्वतःला,
शेजारी खून-दरोडा का पडेना !

डोंगर फोडून खडी-सिमेंटची निर्मिती होतेय
याच जंगलात जगायचंय माणसाला
ध्यान - मनन - चिंतन करत

झाडे तोडून रस्ते रुंदावतात
त्याच 'हायवे'वरून दिमाखाने करायचीय तीर्थयात्रा
विश्वची माझे घर समजून !

# गाठी

तू वायदे कधी करतच नाहीस
गुंतून कशात राहणं
नाही कुठे रेंगाळणं
ना कसलं नातं निभावणं

वरवरचे उठवून तरंग
पाठ फिरवून जातो
विरले वर्तुळ तरी
खडा काळजातच राहतो

किती आणि कसे सांभाळावे
नसतोही दुसरा पर्याय
खरखरीत काटेरीपणात
रुतून पावलांना होतो अपाय

रक्ताळले भाव मनातले
जखम खपली धरते
झेलण्यासाठी घाव पुन:पुन्हा
त्वचा निबर होते

## पानमोकळं

उतार लागल्यावर वाढतो वेग
तुटत जातो एकेक धागा
पानमोकळं होताना झाडाला
दुखत असेल देठाची जागा?

जिवाला जीव द्यायचं
गेलं वय सरून
घ्यावे आता कवेत सारे
अवघे विश्व, हात उभारून

दुखावले, दुरावले आणि रुसले
हे शब्द काढून टाकले कोषातून
दुरून न्याहळताना आनंदात सुख
दुःखात जावे फक्त हेलावून

उरली आता थोडीशी आशा
राखेखालचाही विझू लागला निखारा
शरण जावे घडत जाण्याला
जवळ आला पैलकिनारा !

## भैरवी

कळ्यांचा बहर सुखावतो
धुंदावतो मंद सुगंध खोलवर
नाही साहवत विनाश फुलांचा
निर्माल्य म्हटलं तरी

शिखरावर ठेवून पाय
माळतात मंदिरावर झुंबरे
निरांजनाचे महात्म्य जाणतील का
सूर्याशी स्पर्धा करणारे

खूप जमलेत आपले सारे
एकालाही नसतो जिव्हाळा
मंगलसमयी कुठून आले सूर भैरवीचे
निरर्थक वाटे सण-सोहळा

## प्रतीक्षा

असुनी मी एकटी
हा सूर्यही एकटा
अथांग अवकाशात
वाऱ्याच्या लहरी लाटा

वाफाळलेला चहा थंड होतो
निवते दुपार सूर्य कलत्यावेळी
भान हरवतो वारा
स्मरणात तूच या एकांतवेळी

तुझ्या आठवणींनी क्षण क्षण व्यापून जातो
पेशी पेशीतला रेणू रसरसून तापू लागतो
विरह नसे हा हळवा गात्रागात्रांत तू ठसलेला
झुकत्या पापणीखाली तूच असतो विसावलेला

एकटीच फुलते मी एकटीच झुरते
शून्यात ठेवून दिठीला हृदयी पारिजात फुलविते
प्रतिक्षेत भान हरपले खुळावले स्वप्न झुल्यात
तू जवळी उभा मन वाऱ्याच्या झोक्यात

# कुणीच

कुणीच पाहू नयेत आसू
कुणीही ऐकू नये टाहो
दु:ख असतं फक्त गिळण्यासाठी
ते पोटातच राहो

खरी न होणारी स्वप्ने
तरी उरीपोटी धावणे
काळजातले हंबर लपविण्यासाठी
ओठावर हसू आणणे

ओंजळीएवढीच असते तृष्णा
तेवढाच हवा असतो पाऊस
न मागता मिळेल सारे
तर आयुष्यात रोजच सजेल उरुस

नाती तुटताना होते दु:ख
आक्रसून दोन्ही टोके दुरावताना
निबर होतात भळभळत्या भावना
निळी जांभळी खपली धरताना

## तरंग

उसळणाऱ्या ऊर्मींचं फुलपाखरू
पतंग बनून झेपावतं ज्योतीवर
प्रकाशाची ओढ सत्याची दाहकता
का ठरते अशी अग्निदिव्यावर

ऊब हवी असते
कोवळ्या सूर्यकिरणांची
चटक्यापासून दूर राहताना
गरज भासते झाडाची

भावनांचे तरंग विरण्याआधी
किनाऱ्याला भिडतात
नकळत घडणारे मनीचे भाव
व्यक्त होत राहतात

ते फूल दूरात एकटे
उन्हात रडताना आसू सुकले
नको सोडू सोबत वाऱ्या
तुझ्याविण गंधास मुकले

## आभाळा

आभाळा थांब जरासा
नको धाडू वादळाला
नको भिववू कोवळ्या मना
अंकुर पालवीचा थरथरला

आभाळा थांब जरासा
काळजाचा रे तुकडा
गेला फुलण्या - वाढण्या
परतण्यासाठी वेळ दे थोडा

आभाळा थांब जरासा
आता कुठे टपोरली कळी
कोवळा अजून देठ
उमलू दे गालावरची खळी

आभाळा थांब जरासा
नको कडाडू - धडाडू
लखलखते तुझे आसूड
घनमेघात नको फोडू

# बाल संकुल

सगळेच कसे काटेकोर
उठवायला तुझी नाही हाक
घड्याळाचा असतो गजर
कानाशी किर्रकिराट

थंड पाण्याच्या धारेत
आई, चुलीवरच्या मोडक्या - काळ्या
पातेल्याची आठवण होताना
गरम धारा वाहतात डोळ्यातून

शिळी भाकरी - चटणी तुझ्या हातची
शब्दांची तशीच कडाकडी
आता सगळे मिळते मऊ - ताजे - पौष्टिक
उतरत नाही घास घशाखाली

अंगी लागत नाही काहीच
भरपूर असते अंथरूण - पांघरूण
पाठीवर तुझा हात नाही अन्
तुझ्या कुशीतली ऊब नाही

ओल्या पापणीत भिजवतो
भविष्याची उज्ज्वल स्वप्ने
रात्र निभावून नेतो, उद्याच्या किर्रकिराटाला
अन् थंड पाण्याला सामोरं जाताना
तुझ्या सारखंच उसनं बळ आणतो

## माझ्या पिला

मी मोठी होता होता
सूर्याची सावली बनून राहीन
मी वाढता वाढता
आकाशाची उंची तुला देईन

दुबळी माझी पावले जरी
धावेन अनवाणी तुझ्यासाठी
तूच जिंकण्यासाठी थांबेल
काळही... क्षणकाल... !

कालातीत यश तुझेच असेल
दुबळे पंख तरी मारीन भरारी
पडले तरी रडायचे नसते
आपणच आपली झेप घ्यायची असते

मी उभी आहे
खोलवर मुळे रुजवीत
घट्ट पाय रोवून
घरट्याच्या उंबरठ्यात

विश्वभर फिरून ये
आईच्या कुशीत केव्हाही
तुला झेपावताना पाहण्यासाठीच
ठेवलंय नातं मातीशी

## कधीच...

कधीच त्याने हाकलू नये
म्हणून चाटावे लागतात पाय
दयाळूपणे वागावे म्हणून
व्हावे लागते गरीब गाय

बाणवावी लागते निष्ठा
तुकडे फेकणाऱ्या मालकासाठी
भुंकावेही लागते जोराजोरात
खाल्ल्या मिठाला जागण्यासाठी

लूतभरल्या लाचारीचं लक्तर
स्वाभिमान विसरून गुलाम होताना
मरणाचं भय जगायला लावतं
राखेखालची ठिणगी विझू लागताना

रक्त वाहिले नाही तरी
व्रण सलवतोच मेंदूची कवटी
वाढत्या आयुष्याची अशी वाटचाल
सलत राहतात अदृश्य गाठी

# बरे झाले असते

सहानुभूतीचा बुरखा पांघरून प्रत्येक जण येतो
कसे झाले काय झाले सगळे सगळे विचारतो
अंगाला हात न लावता काळजात हात घालतो
काढून पुन:पुन्हा खपली जीव आमचा भळभळतो

पेपरवाल्यांचे रकाने भरतात
टी. व्ही. चे कॅमेरे फिरतात
लेखकांना कथा सुचते
कविंची प्रतिभा ओसंडून वाहते

काहीच नसताना आमचा दोष
दिवसाला तोंड दाखवायची लाज वाटते
का भोगावे लागतात भोग
कुणाजवळच याचे उत्तर नसते

बरे झाले असते
बरे झाले असते थेट
अब्रूऐवजी त्यांनी घेतला असता
नरडीचाच घोट

## साथ

तुझ्या ओसाड पडलेल्या
भव्य भाळावर
आता भाग्याची चिमूट नसेल

भगभगीत दुखऱ्या काळजात
आता सुखाचं चांदणं
कोण उधळेल?

तुझ्या आक्रंदणाऱ्या
रुद्‌ध कंठाशी
फक्त तुळशीची माळ रुळेल

तुझ्या बांगडीच्या किणकिणाटाशी
आता कुणाचा
कान नसेल

जोडव्यांच्या बोटांचं
ओकं बोकं रितेपण
दुखरे डंख मारतील

तरीही
तुझे गर्भाशय तुझ्यासाठीचे
तुझ्यातच आहे
हिरवंगार गोंदण आणि
पोटचा गोतावळा
तुझ्या साथीला आहे

# मुरली

नभी पाऊस  उरात उरुस  भान हरपली
नदी किनारा  सुसाट वारा  महापूर ती प्याली
अंग बधीर  मन अधीर  तिने लाज सोडली
भोगात आग  लोभात राग  वाट तुझी पाहिली
रक्तात जाग  पेशींची तगमग  कृष्णाकडे धावली
डोंगरी खळाळ  दरीला झळाळ  तहान ओली
धून स्पर्शात  सळसळ रक्तात  वीज घुसली
चैतन्य जडात  झाडे पानात  मोहरून आली
झाडांचा संग  मातीचे अंग  गंधी मिसळली
तू रे सांग  मनाचे रंग  तुझीच स्वप्नबोली
कानात प्राण  गळ्याची आण  तुझ्यात हरवली
अंगात चांदणे  चंद्र सांदणे  प्रीत मुरवली
रंग ठिपके  हृदयी लोलके  रेषा आंदोळली
पेलता वादळ  कुशीत आभाळ  गाली हसली
अशी सुखाची शेज  डोळा नीज  रात्र की सरली
झाडात वारा  हलवी तारा  भुईवर निजली
काळजात कढ  डोळ्यात ओढ  दवात भिजली
फुलांशी हाक  तू जरा वाक  गंधात थिजली
पाऊल तुझे  अंगणी सजे  माथी धूळ माखली

क्षितिज गुलाबी उत्कट शराबी वाट चालली
भगवा शाप सांजेला ताप पहाट पार झाली
तळपत्या जहाल दुतांचे कराल वार झेली
शस्त्र धारदार जळते वार त्वचाही छिनली
आगीत होरपळ उल्कांची माळ गळी पडली
ओथंबल्या क्षणी मनोमरनी पूर्ण उमलली

# निळा-सावळा

पावलात तुझ्या आभाळ
सामावले धरती पाताळ
दूरात धून बासरीची
घे पदरात बांधून वादळ

तहानेने घनव्याकूळ
पाज गायींना पाणी
वसंतात वाळली झाडे
दोषी नाही कुणी

घे शोषूनी या धारा
थेंबाचे वाटे मुळांना
वारूळाला सारून दूर
साखरेचा कण मुंग्यांना

उगाळले गंध प्राक्तनाचे
रेखिले सावळ्या भाळी
कुरळ्या कुंतलाची वेणी
आता नाही रे काळी

गेले उडूनिया रंग
हाती ठेवूनी काळीज
उरला निळा-सावळा
त्याला करावे काबीज

## राधा-कृष्ण

कदंबात चोळी नागवी तू जळी
कृष्ण उभा झाडामागे

असा तुझा शोध होईना बोध
कृष्णं सदा तुजसंगे

डोळ्यांतील धुंदी मन वेडे छंदी
गंधावलीस कृष्णांगे

भारावले पाऊल अंगणी राऊळ
कृष्ण रंगात रंगे

लाज तुझी आभाळी चतुराईची खेळी
कृष्णाला भरसी रागे

मुक्त डोंगर घळी उन्नत वक्षस्थळी
कृष्णाला तहान लागे

देहाची घुसळण रंगाची उधळण
मनावर प्रीतरंग तरंगे

नदीकिनारी गुरे कृष्णही फिरे
खेळवित गोपाळांना

चेंडू गरगरे दिसले घागरे
नको हात घालू चोळ्यांना

पाण्याचे झरे राधे हेच ना खरे
तूच चेंडू लपवताना

घागरीला चरे अंगांगात उतरे
कृष्ण कान्हा चोरताना

# कृष्णमयी

कदंबाच्या झाडामागे
अवगुंठून उभी राधा
यमुनेत सोडूनी पाय
कृष्ण बसलेला असा साधा

अंगभर थरारली
राधेला दिसेना वाट
मनात कृष्ण भरला
रिकामाच राहिला माठ

हुरहूर मावेना उरी
निळी चोळी दाटली
फुलता श्वास सुटली गाठ
अवघी पितांबरी लपेटली

उष्ण झळांनी रसरसली काया
मृदगंध उधळीत मातीपण मोहरले
बहर टचटचला सुगंधी
पानोपानी झाड बहरले

आल्या झिळमिळ लाटा
स्पर्श रेशमी अंगभर तप्त
तुषार्त धुंद रक्तातील कणकण
जडावल्या पापणीत कोसळणारे उत्पात

आंधळे झाले डोळे
पेशी पेशींना आली दृष्टी
बरसली चांदण्यांची रास
प्रणयभराने भारली सृष्टी

# सावळी यमुना

हा वारा प्यावया
घे कान झाकुनी
यमुनेत कृष्ण न्हाला होता
गेले ते वाहूनी पाणी

वाहिली ती वाळू अन्
वृक्षांवरचे आले गेले पक्षी
लपलपत्या साऱ्या आठवणी
सावळ्या नदीच्या वक्षी

थिजला काळ क्षणभर
वारा स्तब्ध झाला
पाहिले आभाळी निळ्या
पितांबरात कृष्ण सजलेला

# वादळ

भगव्या क्षितिजाची
काटेरी झोळी
डोक्यावरून वाहते
रक्तचंदनाची मोळी

वादळात भेदरली
अंधारवृक्ष संगतीला
तापल्या देहावरती
पाऊस तडकला

चांदण्याला लागली आग
पसरली राख शुभ्रतेची
आसवांचा पडला सडा
फुलली फुले निखाऱ्यांची

दरीची आली हाक
डोंगरा दूर सारून
झाली पंखात हलकी
गाठला तळ सूर मारून

दूरात आभाळ पसरले
झेपावले पंख पोटातून
फुलपंखी झाले मन
गेले दरीत मिसळून

गर्जले डोंगरी वादळ
वारा उसळला तळातून
कवटाळतो सांज क्षितिजाला
आभाळ हसले चंद्रकोरीतून

# आई

जनरीतीची चौकट सांभाळता सांभाळता
तू दिलास ना जन्म केलंस पालनपोषण
म्हणूनच केवळ तुझ्याशीच
आहे आता भांडण

बाप, भाऊ, नवरा नि जन्म दिलेला मुलगा काय
त्रयस्थ, उपरे, परकेच, करून सवरून नामानिराळे राहणारे
त्यांना स्त्रित्वाचं नसतंच काही देणं
पीळ तुला कसे कळले नाहीत बाईपणाचे?

तू नेहमीच पाठीशी घालतेस
पूजा केलीस, प्रेम केलंस खऱ्या भावनेने
या कोरड्या, दगडी काळजाच्या, हरामी पुरुषांची
पुरुषी सेवेचे प्रोग्रॅम्स फीड करून
खच्ची केले बाईच्या सर्जनशील भावनांना

पातिव्रत्याची तुझी परंपरा तोलून धरतेस
दास्यत्वाचं तुझं सौभाग्यपण अभिमानाने मिरवतेस
या सगळ्यांना गोंजारताना
मारतेस तू बाईचं माणूसपण

## अंग

हावरी बावरी झाली
झुल्यावर बसून आभाळाला हात लावू पाहत होती
वाऱ्याला कवेत, हवेला पोटात भरत होती
झाडापानाला सावलीत घेत
फुलांचा सडा आकाशी पाहत होती
पक्ष्यांची किलबिल स्वत:च करत होती
मातीकडे नव्हतंच लक्ष, मुळं तर झाकलेलीच
नजर नक्षत्र-ताऱ्यांकडे लागलेली
मोह निद्रेतील स्वप्ने
कळलं नाही अर्धवट जाणिवेला
पान गळालं, फुल उमललं,
पालवी फुटली किंवा फळं लागली
याचं सोयरसुतक फक्त झाडाला
गरजेपुरता पांथस्थ किंवा
कुऱ्हाड चालविणारा गरजू
यांना दिसतं आख्खं झाड
बहर असलेलं किंवा नसलेलं
काळवंडून गेला मनातला मिणमिणता उजेड
कोलमडल्या दिशांच्या मनोमन उभारलेल्या भिंती
तू येणार म्हणून
मनोमन फुललेला पारिजात
मातीत गळून गेला

# तुटणं

चालणं चालूच असेल तरी
ही वाट नसेल पावलाखाली
वाहनांचा घरघराट निळसर धुळीनं माखलेलं घर
अनेक तऱ्हांच्या नजरा
डोळ्यांची ही गर्दी
संपेल आता ओलं-सुकं
इथल्या छोट्या बेटापुरतं
किती म्हणत असलो आपण
'येऊ पुन्हा वगैरे...' तरी...

आलोच ओढीनं तर ते पहिलं ओळखीचं
नसतं काही फारसं
दुरावलेलं असतं बरंचसं
पोटातला खड्डा दुखरा झाल्याची जाणीव
करून देणारी कळ काळजात उठते

रुजू पाहणारं रोपटे
उपटताना तुटतातच काही मुळे
मुळांचे काही अंश बिलगतात मातीला
तळातल्या आठवणीसारखे
तुटत जातं आतडं अन्
आतड्याचं काहीतरी... कुणीतरी...

## झेल

लोभ जडला कुठल्या गोष्टींचा तर ती
दूर दूर पळत राहते
मोहाचं बीज रुजतच असते
मातीखाली खोल खोल ओल शोषीत

कित्येक उन्हाळे पाहिल्यावर सुकतात इच्छा-आकांक्षा
आहे त्याचा स्वीकार करीत शांतपणे जगावं म्हणते
तर भिंतीवर फेकलेल्या चेंडूप्रमाणे
इच्छापूर्ती अंगावर येते

मग घ्यावा लागतो झेल बेसावध क्षणीही !

## पडझड

विहीर खोदायची म्हटल्यावर
आपणच लावतो ना सुरुंग
सवयीने येतेच डोळ्यात ओल
पोटात खड्डाही पडतो खोल

माणसासाठी कायदा असतो
कायद्याच्या राज्यात माणुसकीची हमी कुठे?
आपल्या आपल्यातली संपली आपुलकी
खरी लोकशाही अशी असते?

भविष्याचा अधांतर नाही जोखता येत
अडखळलेली पावले, गुंतलेली मने
हळुवार सोडविणे जिकिरीचे होते
झेप घ्यायची तर मातीशी नातं सोडावेच लागते?

## निवारा

विटेवर वीट रचल्याप्रमाणे घराशी भावबंध जखडलेले
उन्हातले घर सोडताना मनात ऊन उतरलेले
डोळ्यात पाऊस ठेवून ढग
कोसळण्याआधीची तगमग जागती ठेवून गेले

किती घरात राहिले अन् किती घरात रमले
लेकीला माहेराने सोडावे तसे घरांनी मला सोडले
उपकार राहतील त्या क्षणांचे
ज्यांनी मला निरोपावेळचे दुःख भोगू दिले

आपल्यासाठी असलेल्या घरालाही नकोसे होतो आपण
दरवाजा उघडून घर म्हणते जा निघून
कुठलाच पर्याय उरत नाही
आणखी एक कप्पा आठवणींचा सलत राही

कुठल्या घरात माझ्यानंतरचा दिवा जळत राहील
कुठल्या गावाबाहेरच्या भूमीत
माझ्या सरणाच्या ज्वाळा भडकत राहतील
किती दिवस आवरत रहायचा हा पसारा
मनाच्या गाभाऱ्यात शांतीला कधी मिळेल निवारा

# आभाळभर करुणा

बसावं लागेल नुसती
पावसाची वाट बघत
गुडघ्यात डोकं घालून
डोळ्यातून पाणी काढत

वाटायचं पेरलेलं बी
खाऊन टाकतील पाखरं
मग पदरात नाही धान्य
पोटात पडणार नाही अन्न

मनातले घन डोळ्यातले जळ
घेतले शोषून सोडता आशा
आले आभाळ भरून
ओथंबल्या दिशा दिशा

मुरतात धारा धरतीत
झेपावण्यासाठी पुन्हा वणव्यात
माती अंकुरते सणसणत
हिरव्या-पोपटी रेशमात सळसळत

# व्रण

चाखून फळे सुखाची
घातले घाव जिव्हारी
शुद्ध झुळूक गार तुमच्यासाठी
घेताना श्वास विषारी

गेली आहेत खोलवर मुळे
मातीने नव्हते झिडकारले
आकाशाची आस संपेना
सांगाडे पुन्हा अंकुरले

फुटलेली कोवळी स्वप्ने
झाकीत होती खोल व्रणांना
पाखरांना कुशीत बोलविताना
मोठे करत होते देठ पानांना

वाढता वाढता वाढे दु:ख
देठांचे होई जुने खोड
वार झेलण्यासाठी नव्याने
कणखर झाले जुने झाड

## ढळत्या सूर्याबरोबर...

ढळत्या सूर्याबरोबर झाडांच्या सावल्याही फिरतात
पाचोळ्याचाही आवाज येतो
पानगळीच्या दिवसात पावलाखाली
चालणं नसतंच सोडायचं
पायातली कुरूपं असली दुखणारी तरी

माणुसकी धरून वाटचाल करावी तर
कोपरानेच खणू लागतात मऊ लागणारी माती
दुसऱ्यांच्या तालावर नाचता नाचता तोल हरवतो
कोण घेईल सावरण्याची हमी?

अगतिक होता होता एखादा धागा हाताशी येतो
अफाट पडझडीतून फाटलेल्या मनाला टाका घालता येतो
थोडे झुकले तर ओंजळभर तहान भागेल
एवढा निसर्ग नक्कीच उदार आहे

अज्ञात शक्तीमध्ये करुणा आहे
कोवळ्या ओठावर निरागस हसू उमलत आहे
तोंडावरून, केसांवरून फिरणारा ओबडधोबड वृद्ध हात
अन् अनंत आशिष पाठीशी आहेत

## माया

वसंतातली उभी वावटळ
पालवी कोमेजली
सूर्याचे फिरे हात
अंतरीची माया उमजली

कोसळते नदीही
होताना धबधबा
तू असा सावलीत
माझ्या आडोशाला उभा

डोंगराच्या पायथ्याशी
दरीचा हंबर
पाखरांचे थवे
जोजविती कडेकपार

झऱ्याला लागता तहान
खडकाने तडकावे
ओंजळ भरता पाण्याने
कुशीत जोजवावे

## मनमानीपणा

मन हेलावतं
हवेच्या झोतासरशी
मन हिंदकळतं
पाण्याच्या लाटेवरती
मन लटपटतं
रिकामपणाच्या भयानं
मन अस्वस्थ
गर्दीच्या कोलाहलात
मन उमलतं
पाहून कोवळीक
मन लहरतं
धुक्याच्या लाटांवरून

## बोन्साय

गजाआडून खिडकीच्या न्याहळते मी
चंद्र-सूर्य अन् ग्रहताऱ्यांचे आकाश
आडवे येतात गज कधी ढग
मनही थिजत जाते मग सावकाश

खिडकीतून चौकटीएवढाच निसर्ग
पाहत असते त्याचे रोजच रूप बदलणं
वादळ-वारा ऊन-पावसाशी तोंड देणं
तरीही सतत वाढत राहणं, आकाशी झेपावणं

मुक्त वाढीची ओढ अडचणीत टाकते
बंधने वाटतात मऊ रेशीम गाभा
घराच्या सावलीत बोन्साय उभा
घराला माझ्या बोन्सायचीच शोभा

## उद्बत्ती

मेघात लपले चंद्रबिंब
चांदणे झाकोळले
स्तब्ध वाऱ्याला
फुलांनी सुकविले

तुझ्या आठवांचा
कोसळतो पाऊस
चमकून लख्खपणे
काळीज खुपसे वीज

कसे रिचविले कढ
वादळ साचविले मेघा
जळत राहिलेली आवडती रे
उदबत्ती तुला देवा

वाहता वाहता पाणी
खड्डा भरत जाते
तोडून आणलेलीच फुले
तुला भक्तीने वाहते

# कोकीळ

उंचावर बसली
तिला तुझी आस
घे जवळ भरारी
करू नको दुस्वास

पानझडीत संचित पाचोळ्याचे
नको वणवा आंता
चैत्राची फुटू दे कोवळीक
कोकीळ गाता गाता

चंदनी अंग जळते रे
सार्थक राखेत कसले
हो श्रावण धारा
ज्वालेचे फूल बहरले

## ढळलेली दुपार

नळाजवळच्या पाण्याच्या
प्रतीक्षेतली मोकळी भांडी
घरी येणाऱ्यांची वाट पाहणारे डोळे
अंगणात बाळाला जोजवणारी मांडी

रटाळ खरकट्या कामाची
रांधा वाढाची तयारी
कमी झालेले उन्हाचे चटके तरी
दुखरेपणाचा सल सलवणारी

गळत राहणाऱ्या टी. व्ही. ची
वाहत राहणाऱ्या रस्त्याची
ढळलेली, तापलेली दुपार
संध्येच्या चाहुलीची

विषन्न पोकळ भकास बोचरी
काळजावर फिरणारी फांदी काटेरी
उलघाल संपली तरी
हतबलता वाढवणारी

# केव्हातरी

रेड्याने वेद म्हटला होता
मग कदाचित गाढवालाही कळेल
गीता थोडीतरी
अहंकारापुढे खरे प्रेम फळेल
केव्हातरी

सुंभ जळतो तर
पीळही जळण्याची धरूया आस
बदलणे हे जिवंतपणाचे लक्षण तर
निर्जिवतेलाही फुटतील अंकुराचे घोस
केव्हातरी

पाण्याच्या झऱ्याने तडा जातो
कडेकपारीला
फुटेल गहिवर
कोरड्या कठोरतेला
केव्हातरी

## निर्णय

निर्ढावलेला कठोर कोरडेपणा पाहून
भिजत जाते मन अपार
नकळत उगवतात अंतर्मनात
शापीत हुंकार

तेव्हा स्वत:चीच घृणा येते
ओढून ताणून आणावी लागते
मनात क्षमा करण्याची वृत्ती
अशाच नकळत आदळणाऱ्या नि:श्वासांसाठी

वाकवले तेवढे वाकत गेलो आपण
असह्य झाली अगतिकता
कुठून अवतरते अचानक बळ
पेशी पेशीत उतरते हिंस्त्रता

निर्भय होता होता शांतवत जाते मन
येणाऱ्या संकटांना तोंड देण्यासाठी सिद्ध होते
बाजूला होतात दगडधोंडे खळगेही भरून जातात
मोकळ्या होताना वाटा सगळ्या दिशा स्पष्ट होतात

# शृंगार

कोवळे ऊन होते अंगणात
तेव्हापासून पाहतेय वाट
आवाज होऊ नये म्हणून
पापण्याही ठेवल्यात स्थिर
मोकळाच ठेवलाय गळा
तुझ्या ओठांना नको अडथळा
वेटाळू लागल्यायेत स्तब्ध देहाला
ग्रीष्मातल्या भरदुपारच्या झळा
तुझ्या आधी तुझे रक्त आले
मी जन्म दिलेले, अन् मी
पदर सावरून
करू लागले शृंगार
सवाष्णीचा
तुझ्यासाठी

## सय

गार वाऱ्याच्या लहरीत
पावसाचा शिडकावा
असा जिवलग भेटला
डोळ्यातल्या आसवा

न्हाऊन गेले रान
मातीच्या गंधी संगाला
तू दूरदेशी असा
पाऊस पोळतो अंगाला

सांजवाती उजळताना
हृदयी वीज कडाडली
एकटीच मी संध्याकाळी
रक्तात तुझी सय तडकली

क्षितिज हरवले मेघात
अंधार ओला धुपावला
सुन्या सुन्या हिरवाईत
चंद्रबहर झाकोळला

# सोन्याहून लख्ख

रुतलेपण माझे रे
भिरभिर डोळे
सैरभैर वादळात
तुला शोधू पाहे

हळव्या काळजात
असे तुझाच ध्यास
झिनझिन घुमली
अवघ्या रक्तात

डाळिंब दाणे वेचीत
गर्भरेशमी स्पर्शाला
झाकूनी पापणी
जपते ज्योतीला

वेदनेत जळताना
उजळले सतीत्व
अंगभर सजले
सोन्याहून लख्ख

## लग्न

अक्षता दोघांच्या डोक्यावर पडल्या
ताज्या फुलांचे हारही घातले
(एकमेकांचं आयुष्य गळ्यातलं लोढणं
न वाटता सुवासिक व्हावं म्हणून?)
एवढं तर झालं बरोबरीत !
आता गाठ जन्माची (की तुझ्याशी?)
तुझ्या खांद्यावरचे (वरवरचे !) उपरणे
आणि माझ्या सर्वांगाला अनेक वेढ्यांनी,
निऱ्यांनी लपेटलेल्या भरजरी शालूची निरगाठ
तुझी होमाभोवती दमदार ऐटीत पडणारी पावले
जरतारी पदर सांभाळताना माझी होणारी फरफट मागे
बेफिकीर, तोऱ्यात तुझी चाल
उपरणे घरंगळले खांद्यावरून
जरीकाठाची वीज तळपळी
तू मुक्त मोकळा
गवसणी घालण्या आभाळा
मी अवाक्... दगडी पुतळा

वैदिक मंत्रांनी कान भारावलेले...
... मी सांभाळतेय तुझे उपरणे
अन् जुनाट शालूची विरविरती गाठ
एकाकी चालतेय वाट
किती जन्म?

# ऊर्जा

पराभव मान्यच नसतो
याला काय म्हणायचे
लोचट, लुबरेपणा
चिकट की जिवटपणा?
आपटी खाल्ली
उपेक्षेचे आसूड झेलले
अपमानांच्या नजरांनी जखमी केले
दुर्लक्षांचे फटकारे सोसले
तरी
लुतभरल्या कुत्र्याप्रमाणे
लळत, लोंबत लाळ गाळत
पुन्हा आपली उभीच !
आशाळ नजरेने

## साधं जग

माझं हे साधंसं जग, छोटंसं वर्तुळ
या जगात जगताना वाटतं
सहज वाऱ्यासारखं झुळूकावं
झऱ्यासारखं झुळूझुळू वहावं
कधी कधी गर्जावंही सागरलाटा होऊन !

आपल्या पुरत्या मिळालेल्या जमिनीतून
मिळवावं अन्न झाडासारखं
जोजवावं सहज पिलांचं घरटं, पक्ष्यांचं गोकूळ
अन् ऐकावी पाखरांची किरमिजी कुजबूज

सोनेरी सायंकाळचे सु-वर्णी रंग
ल्यावेत अंगभर...

जमले इतकं सोप्पं जगणं
या अवघड जगात?

## बाप गेल्यावर...

बाप गेल्यावर काय काय होतं पारखं लेकीला...
सरकारी कचेऱ्यात सातबारावर सही करताना
सोडून द्यावं लागतं
हक्काचं बालपण
'पोरी गं' म्हणणारं नसतं कुणी
पाहुणीच होते माहेरी
संपतंच मग जन्माचं गाव
जन्मदात्याचं नाव
आतड्याला पीळ पाडणाऱ्या उरतात आठवणी

देण्याघेण्याने उरतात हिशोबी नाती
आणि विरतात दायित्वाचे धागे
रक्षणाच्या अपेक्षेने बांधलेले

जगात फेकलेलेच आपण
मूळ नसतानाचे जगणे

# हुरडा

शेतात हुरड्यावर आलेली टपोरलेली कणसं
बघितली की तुम्हाला लेकी-नातवंडांची
आठवण व्हायची
वाळलेली शेणकुटं आई गोळा करायची
सांगावे धाडायचे, फोनवर बोलावणी
पोरांना घेऊन या म्हणून प्रेमळ जबरदस्तीची आमंत्रणे

कोवळ्या कणसांचा ढीग पडायचा
बांधावरच्या झाडाच्या आडोशाला शेकोटी पेटायची
रापलेल्या पोलादी हातांनी
तुम्ही, हुरडा चोळून द्यायचात !
आमच्या हाती येईपर्यंत तो गरम असायचा
ऊब पोटापर्यंत जाणवायची
रक्ताच्या कणाकणात विरघळायची
हुरड्याबरोबर नसायची कशाचीच गरज
चटण्या, दही, शेंगा यांचा अडथळाच वाटायचा
आण्णा, तुमच्या हातचा असा हुरडा
आता कधी नाही मिळायचा...

हुरडापार्ट्या असतात, तोंडीलावणी त्याहून जास्त
पण तुम्ही नसता या सगळ्यात
तुमचे भाजक्या कणसासारखे दिसणारे
मायाळू हात नसतात
आईची नजर असते,
ओल्या शेणकुटाच्या धुराने ढवूळलेली

★☆★



सावित्री जगदाळे

विझतच नाही माझ्यातली मी !
वादळ वारा थकल्यावर
पंख फडफडावेत पानामागच्या पक्ष्याने
तसा जपतो जिवटपणा तडफडल्यावर !

सावली प्रकाशन